# <u>जाहिर नोटीस</u>

संबंधीतांना या नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेले नाशिक महानगरपालिकेच्या मंजुर योजनेतील आरक्षणाने / रस्त्याने बांधीत क्षेत्र नाशिक महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीताकडून हस्तांतरणीच विकास हक्काच्या [टि.डी.आर.] बदल्यात ताब्यात घेत आहेत. सदर मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी नाशिक महानगरपालिकेस दिलेला आहे.

खालील नमुद मिळकतीवर खालील प्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षिस, खरेदी, पोटगी, लिज - लिन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधीताने प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसांचे आत उपसंचालक नगररचना, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक - 422 002, यांच्या कार्यालयीन दिवशी व वेळेत येवुन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरुपात नोंदवावी.

सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत प्राप्त न झाल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीतांनी तो जाणून बुजून सोडून दिला आहे असे समजुन नाशिक महानगरपालिका सदरच्या आरक्षणाखाली जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि.डी.आर.च्या स्वरुपात खालील जमिन मालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

1] मिळकतीचे वर्णन :-

| | | |
|---|---|---|
| जमिन मालकाचे नांव | :- | स्नेहा हितेश पोद्दार |
| शिवार | :- | वडाळा |
| स. नं. | :- | 60/3 [भाग] |
| 7/12 उता-यानुसार जमिनीचे क्षेत्र | :- | 2900.00 चौ.मी. |
| आरक्षणाखालील [18 मीटर डी.पी. रस्ता] क्षेत्र | :- | 2355.00 चौ.मी. |
| उर्वरीत क्षेत्र | :- | 545.00 चौ.मी. |
| मंजुर विकास योजनेनुसार आरक्षणाचे प्रयोजन | :- | 18.00 मीटर रुंद विकास योजना रस्ता. [डी.पी. रस्ता] |

चतुःसिमा खालीलप्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| पुर्व बाजुस | :- | मिलीटरीची जागा [डिफेन्स लॅन्ड] |
| पश्चिम बाजुस | :- | स.नं.60/3[भाग] उर्वरित क्षेत्र. |
| दक्षिण बाजुस | :- | स.नं.60/3[भाग] उर्वरित क्षेत्र व 18.00 मीटर रुंद विकास योजना रस्ता. |
| उत्तर बाजुस | :- | स.नं.65. |

वरीलप्रमाणे नाशिक महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने / रस्त्याने बाधीत क्षेत्र नाशिक महानगरपालिका उक्त नमुद जमीन मालकाकडून हस्तांतरणीच विकास हक्काचे मोबदल्याव्दारे ताब्यात घेत असल्याने उक्त जमीन मालकाशिवाय अन्य कोणाचाही सदर क्षेत्राशी कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची लेखी हरकत वर नमुद पत्त्यावर दि.१२/६/2018 अखेर सादर करावी.

सदर जाहिर नोटीस नाशिक महानगरपालिकेचे संकेत स्थळ www.nashikcorporation.in येथे देखील प्रसिध्द करण्यात येत आहे.

उपसंचालक, नगररचना [प्र.]<br>
नाशिक महानगरपालिका नाशिक